# ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद कोल्हापूर
## मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम :- (MRDWP)

दिनांक ०१ एप्रिल २००९ पासुन केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम **(National Rural Drinking Water Programme)** चे नियोजन व अम्मलबजावणी कोल्हापूर जिल्हयात सुरु करणेत आली आहे.

परंतु मा. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दि.२९ जुन २०१५ च्या पत्रानुसार १) प्रगती पथावरील योजना २) संसद आदर्श ग्राम योजना ३) फ्लोराईड व आर्सेनिक बाधित योजना व्यतिरिक्त अन्य कोणत्याही नवीन योजना घेण्यात येऊ नयेत अशा सूचना देण्यात आल्या होत्या.

राज्यशासनाने राज्यातील ग्रामीण भागातील पाणी पुरवठा क्षेत्रात सुधारणा करण्याच्या उद्देशाने व ग्रामीण जनतेस स्वच्छ आणि पुरसे पाणी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाचा स्वत:चा सर्वसमावेशक असा ग्रामीण पाणी पुरवठ्याचा कार्यक्रम राबविण्याच्या उद्देशाने "मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम" राबविण्यास शासनाने दि. ०७ मे २०१६ रोजीच्या शासन निर्णायाने मान्यता देण्यात आली.

**मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम आराखडा सादर :-**

मा. प्रकल्प संचालक पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था यांचे पत्र क्रं. वासो/पापुशा/प्र.क्र. १९३/२०१५. दि.२६/११/२०१५. अन्वये दिनांक २७/११/२०१५ रोजी मा. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४६३ स्टॅविली रोड, सेंट मेरीज् चर्च कॅम्प, पुणे-०१. यांच्याकडे खालील प्रमाणे आराखडा सादर केला.

| अ. क. | तपशील | सर्व्हे करणे बाकी | अंदाजपत्रक कार्यवाहीत | अंदाजपत्रक तयार | प्रशासकीय मंजुरीसाठी सादर | तांत्रिक मंजुरीसाठी सादर | टेंडरसाठी सादर | लोकप्रतिनिधी शिफारशीने सादर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | योजना | ३० | ८१ | १० | १७ | २९ | ३६ | ६ | २०९ |
| २ | वाडया | ३६ | १४१ | १६ | १९ | ६५ | ५६ | २८ | ३६१ |
| ३ | अंदाजपत्रकीय रक्कम (लाख) | १३२९.७० | ७७९१.३० | २०४३.०७ | १८४७.९७ | १७३७५.२५ | २५२६.१३ | २२२०.०० | ३५१३३.४२ |

**मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम आराखड्यास मंजुरी :-**

महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णयानुसार मुख्यमंत्री पेयजल कार्यक्रम पेयजल योजना दि.०७ मे २०१६ च्या शासन निर्णयानुसार खालील प्रमाणे मंजुर करण्यात आली.

| अ.क | तपशील | एकूण |
|---|---|---|
| १ | योजना | २३ |
| २ | वाडया | ४१ |
| ३ | अंदाजपत्रकीय रक्कम (लाख) | १९४६.८८ |

परंतु सदर आराखड्यापैकी गडहिंग्जल तालुक्यातील १) हासुरचंपु व २) हिरलगे या दोन योजना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम अंतर्गत प्रगतीपथावर असल्याकारणाने इकडील पत्र क्रं.जा.क्र.कोजिप/ग्रापापुवि/कावि-/वशि/मुपेयो/१६. दि.३० एप्रिल २०१६ च्या पत्रान्वये सदरच्या दोन योजना मुख्यमंत्री पेयजल कार्यक्रम या आराखडयातुन वगळण्यात यावे असे कळवले होते.

१) निधीची आवश्यकता :-

सदर योजनेअंतर्गत एकूण २३ योजना मंजुर झाले आहेत. त्यापैकी २ योजना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम मधून प्रगतीपथावर आहे व दोन योजना रद्द करण्यात आलेल्या आहे. उर्वरित १९ योजनांची अंदाजपत्रकीय रक्कम रु.१५१६.३७ (लाख) इतकी होते. तरी सदर योजनांसाठी चालू वर्षी रक्कम रु.७८२.६० इतक्या निधीची आवश्यकता असून सद्या र.रु.१०८.०० (लाख) इतका निधी प्राप्त आहे.

२) योजनांची सद्यस्थिती :-

सदर योजने अंतर्गत मंजुर सर्व कामे निविदा प्रक्रियेमध्ये होत्या तथापी नवीन शासन निर्णयानुसार जुनी निविदा मंजुरी रद्द करण्यात आली. अंदाजपत्रकात आवशक त्या दुरुस्ती करुन या विभागामार्फत तांत्रिक मान्यता देऊन शासनास सादर करण्यात आली आहेत. शासनाची मान्यता मिळाल्यानंतर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात आली आहे. व प्रशासकीय मंजुरी आदेश मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद कोल्हापूर यांचे मान्यतेने देणेत आले आहे.

या योजनेसाठी लोकवर्गणीची अट नाही. निविदा कार्यवाही व कामाचे संपुर्ण सनियंत्रण जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागकडून होणार आहे.

सद्यस्थितीत जलव्यवस्थापन बैठकीत जिल्हास्तरावरील प्रशासकीय मान्यता रद्द करण्यात आलेली आहे. ग्रामपंचायत स्तरावरील प्रशासकीय मान्यता रद्द करणेत आलेल्या आहेत. अंदाजपत्रकामध्ये नवीन शासन निर्णयानुसार आवश्यक ती दुरुस्ती करुन शासनाकडे सादर करण्यात आली आहेत.

मुख्यमंत्री पेयजल योजनांची शासन निर्णयानुसार आराखडयातील मंजुर गावांचे व्यवहार्यता अहवाल अधीक्षक अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ सांगली यांचे मार्फत पडताळणी होऊन सर्व २१ योजनांचे व्यवहार्यता अहवाल अधीक्षक अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सांगली यांचेमार्फत शासनास सादर करणेत आले आहेत. या २१ प्रस्तावांपैकी २ योजना शासनाकडून रद्द करण्यात आल्या आहेत. ६ योजनांना कार्यारंभ आदेश दिला असून २ योजनांची नस्ती कार्यारंभ आदेशसाठी वित्त विभागस सादर केलेली आहे. ३ योजनांची कार्यारंभ आदेशासाठी ठेकेदारासोबत वाटघाटी सुरु आहेत. तसेच १ योजना निविदा कार्यवाहीत आहे. ६ योजनांची अंदाजपत्रके तांत्रिक व प्रशासकिय मंजुरी कार्यवाहीत आहे. उर्वरित १ योजना शेरे पुर्ततेत आहे.

| अ. क्र | तालुका | एकूण प्रस्ताव | अन्य कार्यक्रमात समाविष्ठ व शासनाकडून रद्द | शिल्लक | कार्यारंभ आदेश दिला | तांत्रिक मंजुरी कार्यवाहीत | निविदा कार्यवाहीत | कार्यारंभासाठी व ठेकेदारासोबत वाटाघाटी | शेरेपुर्ततेत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | करवीर | ४ | १ | ३ | १ | १ | ० | ० | १ |
| २ | राधानगरी | २ | ० | २ | १ | ० | ० | १ | ० |
| ३ | पन्हाळा | २ | ० | २ | ० | १ | १ | ० | ० |
| ४ | शिरोळ | ३ | ० | ३ | ० | ० | ० | ३ | ० |
| ५ | कागल | २ | १ | १ | १ | ० | ० | ० | ० |
| ६ | गडहिंग्लज | १० | २ | ८ | ३ | ४ | ० | १ | ० |
| | एकूण | २३ | ४ | १९ | ६ | ६ | १ | ५ | १ |

वरील सादर केलेल्या अंदाजपत्रकापैकी महाराष्ट्र शासनाकडील पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडील पत्र क्रं.मुपोयो-२०१६/प्र.क्र.७७/पापु-१९. दि.१८ मार्च २०१७ रोजीच्या पत्रान्वये मौ. तमदलगे व कोंडिग्रे ता. शिरोळ या दोन योजनांना मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच पत्र क्रं.मुपेयो-२०१७/प्र.क्र.६६/पापु-१९.दि.२६ एप्रिल १७ रोजीच्या पत्रान्वये मौ. जैनापूर ता शिरोळ या योजनेला मान्यता देण्यात आली. तमदलगे, कोंडिग्रे, जैनापूर या योजनांची निविदा प्रक्रिया पुर्ण आहे. निविदा जादादाराने प्राप्त झाल्याने अंदाजपत्रकीय किमतीपेक्षा ५% जादापर्यंत काम करणेबाबत ठेकेदारसोबत वाटघाटी सुरु आहेत.

तसेच शासनाचे पत्र क्रं मुपेयो-२०१/प्र.क्र.-७७ (भाग-३)/पापु-१९ दि.०७ ऑगस्ट २०१७ रोजीच्या पत्रान्वये मौ.ऐनी, सोळांकूर ता. राधानगरी, माद्याळ ता. कागल, बहिरेश्वर ता. करवीर, हासुरवाडी, नांगनूर, अरळगुंडी व मनवाड ता. गडहिंग्लज योजनांना मान्यता मिळाली आहे. सदर योजनांची अंदाजपत्रके सन २०१६-१७ च्या मजीप्राच्या चालू दरसुचिनुसार सुधारित करणेत आलेली असून तांत्रिक मान्यत व प्रशासकिय मान्यता देणेत येवून निविदा प्रक्रिया पुर्ण झाली आहे. आवळी ता. पन्हाळा या योजनेस प्रशासकिय मान्यता देणेत येवून निविदा प्रक्रिया चालू आहे.

# मुख्यमंत्री पेयजल कार्यक्रम

## ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद कोल्हापूर

### तांत्रिक मंजुरी प्रदान केलेल्या योजनांची माहिती

| अ.क्र | तालुका | गावाचे नांव | वाडी/वस्तीचे नांव | अंदाजपत्रकिय किंमत रु | तांत्रिक मंजुरी दिनांक | अंदाजपत्रक शासनास सादर दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **शिरोळ** | **तमदलगे** | **तमदलगे** | **१४५००३२०** | **१८.०३.१७** | **१८.०३.१७** | **५ % जादा दरापर्यंत ठेकेदाराशी वाटाघाटी सुरु** |
| **२** | **शिरोळ** | **कोंडिग्रे** | **कोंडिग्रे** | **२१६६८३६४** | **१८.०३.१७** | **१८.०३.१७** | |
| **३** | **शिरोळ** | **जैनापूर** | **जैनापूर** | **१६३४४७८०** | **१८.०३.१७** | **२६.०४.१७** | |
| ४ | राधानगरी | सोळांकूर | सोळांकूर | ४४७५६२२ | ०६.११.१७ | १६.११.१६ | **कार्यारंभ आदेश दि.१६/०२/२०१८** |
| ५ | राधानगरी | ऐनी | ऐनी | ७२२०२९४ | ०६.११.१७ | १६.११.१६ | **कार्यारंभ आदेशासाठी नस्ती सादर** |
| ६ | करवीर | बहिरेश्वर | बहिरेश्वर | ७६०१७५० | ०६.११.१७ | १६.११.१६ | **कार्यारंभ आदेश दि.२७/०२/२०१८** |
| ७ | गडहिंग्लज | अरळगुंडी | अरळगुंडी | ३२१६००० | ०६.११.१७ | १६.०५.१७ | **कार्यारंभ आदेश दि.०७/०३/२०१८** |
| ८ | कागल | माद्याळ | माद्याळ | ६७७६००० | ०६.११.१७ | १६.०५.१७ | **कार्यारंभ आदेश दि.२८/०२/२०१८** |
| ९ | गडहिंग्लज | मनवाड | मनवाड | २८१२६८० | ०६.११.१७ | १६.११.१६ | **कार्यारंभ आदेश दि.०७/०३/२०१८** |
| १० | गडहिंग्लज | नांगनुर | नांगनुर | ८७६५००० | ०६.११.१७ | १६.०५.१७ | **कार्यारंभ आदेश दि.०७/०३/२०१८** |
| ११ | गडहिंग्लज | हासुरवाडी | हासुरवाडी | २८६९००० | ०६.११.१७ | १६.०५.१७ | **कार्यारंभ आदेशासाठी नस्ती सादर** |
| १२ | पन्हाळा | आवळी | आवळी | १४१६४४४० | २४.०१.१८ | १६.११.१६ | **निविदा कार्यवाहीत** |
| १३ | करवीर | चुये | चुये | ३४९४६३९ | ११.११.१६ | १६.११.१६ | शासनास सादरीकरण केले |
| १४ | करवीर | कावणे | कावणे पुनर्वसन | ३४४४५७८ | ११.११.१६ | १६.११.१६ | शासनाकडून रद्द |
| १५ | करवीर | कांचनवाडी | कांचनवाडी | ८६८०७४५ | ११.११.१६ | १६.११.१६ | शासनास सादरीकरण केले |
| १६ | गडहिंग्लज | बसर्गे बु ा | बसर्गे बु ा | ७८४०५२० | ११.११.१६ | १६.११.१६ | शासनास सादरीकरण केले |
| १७ | गडहिंग्लज | माद्याळ क ा नूल | माद्याळ क ा नूल | ४९७९३४० | ११.११.१६ | १६.११.१६ | शासनास सादरीकरण केले |
| १८ | गडहिंग्लज | कडलगे | कडलगे | ३७५५०२० | ११.११.१६ | १६.११.१६ | शासनास सादरीकरण केले |
| १९ | गडहिंग्लज | कुमरी | कुमरी | २३३०९४६ | १८.०३.१७ | २०.०३.१७ | शासनास सादरीकरण केले |
| २० | पन्हाळा | मरळी | मरळी | ६६९७०८६ | १६.११.१६ | २१.११.१६ | शासनास सादरीकरण केले |
| **एकूण** | | | | **१.५२E+०८** | | | |